महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.५/ **२०८२६**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.1,धारावी रोड,माटुंगा,
**मुंबई**-४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**दिनांक : ३०.०६.२०१४.**

# प रि प त्र क

**विषय: विद्युत सहाय्यक यांना कंपनीचे मोबाईल सिमकार्ड व कंपनीचे निवासस्थान देण्याबाबत.**

----------

कंपनीमध्ये विद्युत सहाय्यक या पदावर कंत्राटी पध्दतीवर तीन वर्ष कालावधीकरिता उमेदवारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या विद्युत सहाय्यकांना तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी समाधानकारकपणे पुर्ण केल्यानंतर कनिष्ठ तंत्रज्ञ या पदावर सामावून घेण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. विद्युत सहाय्यकांना कनिष्ठ तंत्रज्ञ या पदाचा अनुशेष आणि रिक्त पदे विचारात घेऊन नेमणुक देण्यात आलेली आहे.

२. प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ३३४ दिनांक ०१.०४.२०११ अन्वये मुख्य कार्यालय त्याचप्रमाणे क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना भ्रमणध्वनी (मोबाईल फोन) च्या सुविधा देण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. सदरच्या मार्गदर्शक सुचनानुसार ज्या पदावरील कर्मचारी या सुविधेकरिता पात्र म्हणून संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी घोषित केलेले आहेत तथापि सदरची पदे रिक्त असून त्या पदावर विद्युत सहाय्यक यांची नेमणुक करण्यात आली आहे, अशा सर्व विद्युत सहाय्यकांना भ्रमण ध्वनीची सुविधा प्रदान करण्यात यावी. भ्रमण ध्वनीची सुविधा प्रदान करताना महिला विद्युत सहाय्यक यांना प्राधान्य देण्यात यावे.

४. कंपनीतील कर्मचाऱ्यांकरिता क्षेत्रिय कार्यालयामध्ये निवास स्थानाची सोय करण्यात आलेली आहे. तथापि असे निर्दशनास आले आहे की, क्षेत्रिय कार्यालयात बहुतांश ठिकाणी निवासस्थाने रिक्त असून त्या करिता कोणत्याही कर्मचाऱ्याची मागणी अथवा प्रतिक्षा यादी नाही, याद्वारे असे सुचित करण्यात येते की ज्या ठिकाणी निवासस्थाने रिक्त असून त्याकरिता मागणी नाही अशी निवासस्थाने प्राधान्याने महिला विद्युत सहाय्यकांना देण्यात यावीत आणि त्याचे भाडे सवलतीच्या दराने आकारण्यात यावे.

५. सदरचे परिपत्रक हे कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(संदेश हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**